कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत रास्तभाव दुकानदारांकडून वसूल केल्या जाणाऱ्या बाजार फी व देखरेख फी च्या रकमेची प्रतिपुर्ती संदर्भात.

महाराष्ट्र शासन

अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक : कृबास-१४१७/व्हीआयपी-६/प्र.क्र.६४/नापु २१

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१७

संदर्भ: शासन निर्णय, क्रमांक:कृबास-१४१५/प्र.क्र. ८४/नापु २१, दि.३१/०८/२०१६.

प्रस्तावना:-

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १६६३ या अधिनियमातील तरतूदीनुसार बाजार फी वसूलीसाठी बाजार क्षेत्रात खरेदीदाराकडून खरेदी होणे अभिप्रेत आहे. परंतू,रास्तभाव दुकानदार हा खरेदीदार म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात प्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारे खरेदी-विक्रीचा व्यवहार करीत नसल्याने, यापुढे रास्तभाव दुकानदारांनी कृषी उत्पन्न बाजार समितीस बाजार फी व देखरेख फी ची प्रतिपुर्ती करु नये अशा सूचना संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि, दि.३१/०८/२०१६ पुर्वीच्या कालावधीची देयके अदा करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने दि.३१/०८/२०१६ पुर्वीच्या कालावधीची देयके अदा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमार्फत रास्तभाव दुकानदारांकडून वसूल केल्या जाणाऱ्या बाजार फी व देखरेख फी च्या देयकांच्या प्रतिपुर्तीच्या धोरणाबाबत संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदी कायम ठेवून, सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापुर्वीच्या कालावधीची म्हणजेच दि.३१/०८/२०१६ च्या पुर्वीच्या कालावधीतील जी देयके यापुर्वी अदा करण्यात आलेली नाहीत, अशी कृषी उत्पन्न बाजार समितीची बाजार फी व देखरेख फी च्या देयकांची प्रतिपुर्ती करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

राज्यातील ज्या कृषी उत्पन्न बाजार समितींकडून दि.३१/०८/२०१६ पुर्वीच्या कालावधीची देयके जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली आहेत. अशा देयकांच्या कालावधीची तपासणी केल्यानंतर तसेच, या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **जोडपत्र अ** मधील बाबींची पुर्तता केल्यानंतर अशा देयकांचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी उप आयुक्त (पुरवठा) यांच्या मार्फत शासनास सादर करावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७११०६११२७२६३१०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2017.11.06 12:00:33 +05'30'

(सतीश सुपे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त.
२. सर्व जिल्हाधिकारी (जिल्हाधिकारी,मुंबई वगळता)
३. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
४. वित्तीय सल्लागार व उप सचिव,अनापुवग्रासं विभाग.
५. संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
६. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
७. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.
८. सर्व तहसिलदार.
९. सहकार व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय,मुंबई.
१०.पणन, संचालक,महाराष्ट्र राज्य.
११. निवडनस्ती, नापु २१.

कृषि उत्पन्न बाजार समिती फी मंजूरीबाबत तपासावयाच्या बाबी

अ.क्र.	तपासावयाच्या बाबी
१.	रास्तभाव दुकानांना धान्य वितरीत करण्यात आल्याबाबतची दुकान निहाय आणि तारीख निहाय माहिती गोदाम चालकांच्या/व्यवस्थापकाची सही असावी.
२.	सदर माहितीसह प्रस्ताव तालुका कार्यालयामार्फत जिल्हा पुरवठा अधिकारी यांना पाठविल्याची खात्री करावी.
३.	संकलित केलेली माहिती बिनचूक असल्याबाबतचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
४.	प्रस्ताव तीन वर्षानंतर प्राप्त झाला असल्याचे खात्री करावी. वित्त विभागाच्या दि.३०.११.१९९८ मधील शासन निर्णयानूसार.
५.	दि.३०.११.१९९८ च्या शासन निर्णयानूसार अशा प्रकारचे शुल्क प्रदान करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले आहे. मात्र याप्रकरणी प्रदत्त शक्तीनूसार कार्यवाही होऊ शकणर नाही, अशी प्रकरणे विभागीय आयुक्त यांनी पुढील कार्यवाहीसाठी शासनास पाठवावी. त्याबाबत तपासणी करावी.
६.	गोदामाच्या ठिकाणी कृषी उत्पन्न बाजार समितीने १) विश्रांतीकरीता छोटेसे विश्राम गृह, २) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ३) शौचालय व मुत्रीघर इत्यादी सोय असल्याबाबतची माहिती.
७.	शासकीय गोदामातून वितरीत केलेल्या धान्यावरील बाजार फी कृषी उत्पन्न बाजार समितीस यापुर्वी अदा केली नसल्याबाबतचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र प्रस्तावात असल्याबाबतची खात्री करावी. तसेच, याबाबतचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रमाणपत्र असल्याबाबतची खात्री करावी.
८.	शासकीय गोदामातून वितरीत केलेल्या स्वस्त धान्यावरील बाजार फी कृषी उत्पन्न बाजार समितीने स्वस्त धान्य दुकानदारांकडून परस्पर वसूली केलेली नाही. याबाबतची कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रमाणपत्र प्रस्तावासोबत असल्याची खात्री करावी.
९.	शासकीय गोदामातून वितरीत केलेल्या स्वस्त धान्यावरील बाजार फी मिळण्याबाबतचा प्रस्ताव साठा लेखेवरुन तपासले असून बरोबर असल्याबाबतचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रमाणपत्र असल्याची खात्री करावी.
१०.	बाजार शुल्क व पर्यवेक्षण शुल्क मिळण्याबाबतचा कृषी उत्पन्न बाजार समितीचा ठराव असावा.